# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२७** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र :- १७८** **दिनांक :- २७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/३७/२०२४-२५ दि.२५/०९/२०२४

३. उपायुक्त यांचा दि.०६/०९/२०२४ चा अभिप्राय

४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०६/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका पर्यावरण विभागाकरीता राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम (NCAP) निधी अंतर्गत Truck Mounted Mist / Fogger Machine -०१ नग खरेदी करीता प्रस्तावित TATA LPT 712 or Equivalent ऐवजी TATA LPT९१२ or Equivalent असा तांत्रिक बदल करण्याबाबत प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

NCAP निधी अंतर्गत मनपा पर्यावरण विभागाकरीता TATA LPT 712 or Equivlaent चेसिस वर ३००० लिटर क्षमतेचे Fogger / Misting Maachine १ नग खरेदी कामी जा.क्र./जशमनपा/वाहन वि./२०/२०२४-२५ दि.०७/०८/२०२४ अन्वये ई-निविदा सुचना क्र.५०२ सन २०२४-२५ सदर ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gove.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून अशी ई-निविदा सुचना दै.पुण्यनगरी वर्तमान पत्रात प्रसिध्द केले नुसार संकेतस्थळाव्दारे निविदा भरणे करीता दि.०७/०८/२०२४ ते दि.१६/०८/२०२४ पर्यंत मुदत देण्यात आलेली असुन दिलेल्या मुदतीत एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

महानगरपालिकेच्या ई-मेल आयडीवर सदर टेंडर संदर्भात Technical Objection नोंदविण्यात आलेले असुन त्यानुसार वाहनाच्या मॉडेल मध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्यानुसार TATA LPT ९१२ or Equivlaent चेचिस वर ३००० लिटर क्षमतेचे Fogger / Misting Maachine १ नग ची बांधणी करता येईल. सदरचे वाहनांच्या मॉडेलमध्ये झालेल्या बदलास कार्योत्तर मान्यता मिळणेस व जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यास तसेच प्रसिध्दी कामी येणाऱ्या अंदाजित खर्चास मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२७** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र :- १७९** **दिनांक :- २७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/३८/२०२४-२५ दि.२५/०९/२०२४
३. सहाय्यक आयुक्त (वाहन) यांचा दि.०५/०९/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.०६/०९/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०६/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** Designing, Construction, Fabrication, Erection, Commissioningand Testing of Advance Multipurpase Fire Tender TATA/Ashoka Leyland / Bharat Benz / Mahindra 19 ton BS VI Cowl Chassis 1nos. and Designing, Construction, Fabrication, Erection, Commissioning and Testing of Water Bowser Tender on TATA/Ashoka Leyland / Mahindra / Bharat Benz Model Bs VI 28 ton capacity cowl Chassi 1nos. असे एकूण ०२ नग चेसीस खरेदी व बांधणी करणे कामी ई-निविदा प्रसिध्द करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अशस/१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२० मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.३१/०८/२००९ नुसार परिशिष्ठ क मध्ये नमूद प्राथम्य ३ नुसार पृष्ठ क्र२५ वर नमूद केले नुसार जळगांव शहराकरीता अग्निशमन वाहन (लोकसंख्येवर आधारीत) केलेनुसार अनुज्ञ ७ वाहने असून उपलब्ध ४ वाहने आहेत ३ वाहनांची तूट आहे. महाराष्ट्रातील ड वर्ग महानगरपालिका, नगरपरिषद तसेच नगरपंचायत यांच्या अग्निशमन सेवेतील तूट भरुन काढणे करीता व राज्यातील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणे करीता विविध आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने “महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान” राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदयस्थितीत “महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान” अंतर्गत नागरी भागात अग्निशमन सेवेशी निगडीत पायाभुत सुविधांचे बळकटीकरण, अग्निशमन केंद्र बांधणे, अग्निशमन वाहने उपलब्ध करुन देणे, राज्य अग्निशमन अकादमीचे बांधकाम पुर्ण करणे, प्रगत अग्निशमन अकादमीचे बांधकाम करणे इ. बाबींची अमलबजावणी करण्यात येईल. अग्निशमन वाहने/ सहउपकरणे खरेदी करणेसाठी शासनामार्फत संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या तांत्रिक समितीच्या मदतीने वेळोवेळी शासन स्तरावरुन दर करार निश्चित करुन देण्यात येईल. त्यानुसार अग्निशमन वाहने / उपकरणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे अथवा इतर शासकीय विभाग / उपक्रम खरेदी करु शकतील.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२७/नवि-२० मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.१२/०८/२०१६ नुसार नव्याने निर्माण झालेल्या / होणाऱ्या ड वर्ग महानगरपालिका, नगरपरिषद, तसेच नगरपंचायतीमधील अग्निशमन सेवेची तूट भरुन काढणेसाठी “महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान” योजनेत समावेश करण्यात यावा. त्यामध्ये जळगांव शहर महानगरपालिकेचा समावेश आहे. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अशस/२०१९/प्र.क्र.६९/नवि-०४ मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.१२/०३/२०२१ नुसार सदयस्थितीत जळगांव शहर

महानगरपालिका मालकीची अनुक्रमे टाटा १६१३ फायर फायटर (१) MH१९ M९०४७ (२) MH१९ M९०४८ (३) MH१९ M९०५० व टाटा ७०९ मिनी फायर फायटर MH१९ M९३४३ अशी एकूण चार वाहने कालबाह्य झालेली आहे. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अशस/२०१९/प्र.क्र.६९/नवि-०४ मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.१२/०३/२०२१ मधील अ.क्र.४ चे अवलोकन होणेस विनंती.

महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, सांताक्रुज - पुर्व, मुंबई यांचेकडील पत्र क्र.मअसे/२०२१/३२-एफ/१४४७ दि.१३/१०/२०२१ नुसार जळगांव शहर महानगरपालिकेचे एकूण क्षेत्रफळ ६८.२४ चौ.की. असून सन २०११ चे जनगणनेनुसार ३,६७,६१८ ऐवढी आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार कौन्सिलच्या शिफारशीनुसार क्षेत्रफळानुसार ६८.२४ चौ.कि.मी. क्षेत्रफळासाठी किमान ०७ अग्निशमन केंद्र आवश्यक असून लोकसंख्येनुसार एकूण ०७ अग्निशमन वाहने वॉटर टेंडरची आवश्यकता आहे. महासभा ठराव क्र.७७१ दि.२४/०३/२०२२ नुसार जळगांव शहर महानगरपालिकेचा वाढता विस्तार तसेच औदयोगिक व्यापारी क्षेत्राचा देखिल विकास होत असून त्या नुसार मनपा अग्निशमन विभागाकडे अदयावत अशी अग्निशमन यंत्रणा असणे अत्यंत गरजेचे आहे. सदर कामी मनपा कडेस अस्तित्वात असलेल्या अग्निशमन बंब हे पारंपारीक पध्दतीचे आहेत. या वाहनांसह अदयावत यंत्रणेसाठी आधुनिक अग्निशमन मल्टीपर्पज वाहनाची अत्यावश्यकता भासत असून आधुनिक अग्निशमन मल्टीपर्पज वाहनांमध्ये पाण्याची टाकी, फोम टँक, डी.सी.पी., सि.ओ.टू., टाईप फायर एक्सटींग्युशर तसेच लाईट मास्ट, विंच व अदयावत असे ४० ते ५० उपकरणे असलेले मनपा अग्निशमन विभागाकरीता ०१ नग नविन आधुनिक मल्टीपर्पज वाहन खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. जा.क्र./ज.श.म.न.पा./वा.व्य.वि./३७/२०२२ दि.०९/०६/२०२२ नुसार अग्निशमन अधिकारी मनपा जळगांव यांना पत्र देण्यात आलेले होते. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अशसे/२०२३/प्र.क्र.८९/नवि-०४ मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.०१/१२/२०२३ नुसार महानगरपालिका/ नगरपालिकांमध्ये राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र अग्निशमन सुरक्षा अभियानांअंतर्गत अग्निशमन वाहनांची खर्च मर्यादा ०.९० (रु.कोटी) प्रती वाहन निश्चित केलेली आहे. खर्च मर्यादेपेक्षा जास्त खर्च होणार असल्याने महासभा व राज्य शासनाची मान्यता घेणे आवश्यक व क्रमप्राप्त राहील. स्थायी समिती प्रशासक ठराव क्र.१२५ दि.१८/०७/२०२४ नुसार महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ कलम २५ पोटकलम १ नुसार आग सुरक्षा निधी या नावाने संबोधला जाणारा एक विशेष निधी स्थापन करण्यात आलेला आहे. तसेच कलम २५ च्या पोटकलम ३ नुसार अग्निशमन पथके सेवा चालविणेसाठी (अग्निशमन अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि इतर अनुषंगिक खर्च याचा समावेश असेल) आणि विशेषत: प्राधिकरणाच्या हद्दीत अथवा हद्दीबाहेरील कोणत्याही जमिनीवर किंवा कोणत्याही इमारतीत आगीस प्रतिबंधक करण्याच्या किंवा आग विझविण्याच्या प्रयोजनार्थ, अत्याधुनिक साधन सामुग्री व उपकरणे पुरविणेसाठी, या निधीतील रक्कम वापरण्यात येईल, आणि या अधिनियमामध्ये उल्लेखलेल्या प्रयोजनाव्यतीरीक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी ती वापरण्यात येणार नाही असे सदर अधिनियमात नमूद आहे. जळगांव शहराचा वाढता विस्तार व शहरात निर्माण होणाऱ्या उंच इमारती लक्षात घेता नागरीकांना तात्काळ मदत व प्रतिसाद मिळणे कामी अग्निशमन दलात अत्याधुनिक अग्निशमन वाहने असणे आवश्यक आहे. प्रस्तावित केले प्रमाणे १ नग

Advance Multipurpose Fire Tender on TATA/Ashok Leyland/Bharat Benz/ Mahindra 19 ton BS VI Cowl Chassis व १ नग Water Bowser Tender on TATA/Ashoka Leyland / Mahindra / Bharat Benz Model Bs VI 28 ton capacity cowl Chassi असे दोन नविन अग्निशमन वाहने खरेदी करणे करीता अंदाजे खर्च रक्कम रु.२,८६,६३,८३१/- आवश्यक आहे. म.न.पा. आग सुरक्षा निधी मध्ये एप्रिल २०२४ अखेर रक्कम रु.२,३३,३४,२३३ शिल्लक निधीमधून खर्च करणेस तसेच नमूद दोनही वाहनांसाठी उपरोक्त रक्कमेवरील खर्च रक्कम रु.५३,२९,५९८/- मनपा फंडातून सन २०२४-२५ मधील नविन वाहन व फायर वाहन खरेदी साठी केलेल्या रु. २ कोटी अर्थसंकल्पीत तरतूदीमधुन करण्यास संदर्भिय ठरावाअन्वये मान्यता प्रदान करण्यात मंजुरी देण्यात आलेली आहे.

जा.क्र./ज.श.म.न.पा./फायर/२३२/२०२४-२५ दि.०७/०८/२०२४ नुसार आयुक्त यांचे मान्यतेने टेक्नीकल स्पेसिफिकेशनसह तांत्रिक मान्यता मिळणे कामी जशमनपा/फायर/२३२/२०२४-२५ दि.०७/०८/२०२४ अन्वये संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांना पत्र पाठविण्यात आलेले होते. त्यानुसार महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, विदयानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रुज - पुर्व-मुंबई-४०००९८ पत्र क्र.३७९/१३०२ दि.२०/०८/२०२४ अन्वये संचालक, अग्निशमन सेवा मुंबई यांचे कडील पत्र क्र.मअसे-२०२४/३७-ए/१३०२ दि.२०/०८/२०२४ नुसार अग्निशमन वाहनांचे तांत्रिक तपशिल निश्चित केलेले आहे. सदर विविध क्षमतेचे अग्निशमन

वाहनांचे तपशिल www.mahafireservice.gov.in At a glance Technical Specification या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. त्यानुसार उपरोक्त अग्निशमन वाहनासाठी BS-VI चेसिस खरेदी करुन वाहनाची बांधणी करणे तांत्रिक मान्यता मिळालेली आहे.

सदरचे काम www.gem.gov.in या पोर्टलवरुन किंवा योग्य ती विहित शासकीय ई-निविदा प्रक्रियेनुसार करण्यात यावी असे पत्रात नमुद आहे. सदर पत्रासोबत संचालनालयाच्या संकेतस्थळावरुन विविध क्षमतेच्या अग्निशमन वाहनाचे तपशिल (Technical Specification) प्रती काढलेल्या आहेत. Advance Multipurpase Fire Tender TATA/Ashoka Leyland / Bharat Benz / Mahindra 19 ton BS VI Cowl Chassis 1nos. and Water Bowser Tender on TATA/Ashoka Leyland / Mahindra / Bharat Benz Model Bs VI 28 ton capacity cowl Chassi 1nos. असे ०२ नग चेसिस बांधणी, उपकरणांसह वाहने पुरवठा करणे कामी शासनमान्य अधिकृत बांधणी करणारे वितरक यांचेकडून ई-निविदेव्दारे भाव मागविणेस व ई-निविदा राज्यस्तरीय प्रसिध्द करणे, दैनिक वृत्तपत्रातून जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यास व त्या कामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२७** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०३** **प्रशासक ठराव क्र :- १८०** **दिनांक :- २७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त,आरोग्य विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./आरोग्य वि./६७१/२०२४-२५ दि.२५/०९/२०२४
३. उपायुक्त (सा.प्र.) यांचा दि.२५/०९/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२५/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जैविक घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम १९९८ व सुधारीत २००० नुसार जळगांव जिल्हयातील व शहरातील निर्माण होणाऱ्या जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी मे.मन्साई बॉयोमेडिकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.लि.,जळगांव यांना सामाईक सुविधा म्हणून प्रकल्प उभारणेस व मुदतवाढ देणेबाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त,आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मे.मन्साई बॉयोमेडिकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.लि.,जळगांव यांनी दिलेल्या पत्रात जैविक घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम १९९८ व सुधारीत २००० नुसार शहरात निर्माण होणाऱ्या जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावणेसाठी महासभा ठराव क्र.६६ दि.११/०२/२००५ मान्यते अन्वये सामाईक सुविधा म्हणून प्रकल्प उभारण्यात आलेला होता व जळगांव महानगरपालिका व मे.मन्साई बॉयोमेडिकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.लि.,जळगांव यांचे सोबत बि.ओ.टी. तत्वावर सामाजिक सुविधा म्हणून २० वर्षा करिता करार करण्यात आलेला असून प्रकल्प प्रत्यक्षात दि.१८/०७/२००६ पासून कार्यान्वीत होवून आज रोजी सदर प्रकल्पास १८ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे.

तसेच आरोग्य जा.क्र./५३२/ दि.१३/०७/२००५ अन्वये कार्यादेश देण्यात आलेले असून सदर कार्यादेशात प्रकल्प उभारणी करण्यासाठी विविध विभागाचे परवाने घेण्यासाठी कार्यादेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांचा वेळ देण्यात आलेला होता. परंतू करारनाम्यातील अटी शर्तीनुसार महानगरपालिकेस सर्व्हे क्रं.३९० मधील एक एकर जागा कंपनीस देण्यात येणार होती. परंतू सदरची जागा म.न.पा.च्या नावे नसल्यामुळे सदर जागेऐवजी सर्व्हे नं.४१३ मधील एक एकर जागा देण्यात आलेली आहे. तसेच सदर ठिकाणी विदयुत व इतर सुविधा नसल्यामुळे प्रकल्प प्रत्यक्षात आयुक्त यांच्या आदेशानुसार दि.१८/०७/२००६ अन्वये कार्यान्वीत करण्यात आलेला होता. वरील तांत्रिक बाबींची पुर्तता करण्यासाठी तत्कालीन आयुक्त यांनी मुदतवाढ दिलेली होती. सदर मुदतवाढीनंतर प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आलेली होती. तद्नंतर सुध्दा जळगांव शहरातील वैदयकीय व्यावसायिक यांनी १ वर्ष कालावधीपर्यंत नोंदणी केलेली नव्हती.

जळगांव जिल्हयातील वैदयकीय व्यावसायीकांकडून जैविक घनकचरा संकलन करुन कानकाई शिवार, शिवाजी नगर येथील जैविक घनकचरा प्रकल्पावर नियमानुसार प्रक्रिया करण्यात येत होती. प्रकल्पास दि.०२/०१/२०२४ रोजी आग लागल्यामुळे सदरचा प्रकल्प बंद झालेला असून सदर प्रकल्पाची उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ,जळगांव यांचे अधिकाऱ्यांनी स्थळ निरीक्षण करुन तसा अहवाल प्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचेकडेस सादर केलेला होता.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचे कडील जा.क्र.MPCB/RONK/०६/२०२४ दि.०२/०१/२०२४ रोजीच्या पत्रानुसार जैविक घनकचरा प्रकल्प जळाल्याने बंद पडल्यामुळे जैविक घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची पुन्हा नव्याने परवानगी मिळणे पर्यंत विल्हेवाट प्रक्रिया थांबविण्याचे निर्देश देवुन जळगांव जिल्हयातील जैविक घनकचऱ्याचे संकलन करुन शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावाणे कामी तात्पुरती

पर्यायी व्यवस्था म्हणून मे.श्री स्वामी समर्थ एन्टप्रायजेस, धुळे येथील जैविक घनकचरा कार्यान्वीत प्रकल्पावर विल्हेवाट लावावी असे निर्देश कंपनीस व महानगरपालिकेस पत्रान्वये कळविलेले आहे. त्यानुसार जळगांव जिल्हयातील जैविक घनकचरा संकलन करुन शास्त्रोक्त पध्दतीने धुळे येथील जैविक घनकचरा कार्यान्वीत प्रकल्पावर विल्हेवाट लावणेसाठी जा.क्र./आरोग्य वि./८०२ दि.५/०१/२०२४ नुसार ना-हरकत प्रमाणपत्र तत्कालीन आयुक्त यांचे मान्यतेने देण्यात आलेले आहे.

त्यानुसार मे.मन्साई बॉयोमेडिकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.लि.जळगांव कंपनीमार्फत आज रोजी जळगांव जिल्हयातील जैविक घनकचऱ्याचे संकलन करुन शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट मे.श्री स्वामी समर्थ एन्टप्रायजेस,धुळे यांच्या प्रकल्पावर करणेत येत आहे. तसेच सदर जैविक कचऱ्यावर दैनंदिन प्रक्रिया होणे अत्यंत आवश्यक असल्याने जळगांव ते धुळे दरम्यान दैनंदिन जैविक कचऱ्याची वाहतूक करणेसाठी इंधन खर्च, वाहन खर्च व धुळे येथील प्रकल्पावर विल्हेवाट लावणे कामी खर्च मोठया प्रमाणावर असल्याने आज रोजी मे.मन्साई बॉयोमेडिकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.लि.,जळगांव कंपनी तोटया मध्ये काम करीत आहे.

सदरचा प्रकल्प जळगांव येथे नव्याने उभारणी करणेसाठी कमीत कमी १ ते १.५० कोटी रुपये खर्च अपेक्षित असुन आमच्या सोबत म.न.पा.ने केलेल्या करारानुसार उर्वरित कालावधीत म्हणजे मुदतीत ऐवढा खर्च करुन मे.मन्साई बॉयोमेडिकल वेस्ट ऐंटरप्रायजेस प्रा.लि.,जळगांव कंपनीस मोठे नुकसान होईल तसेच सदर नुकसान मे.मन्साई बॉयोमेडिकल वेस्ट्र एंटरप्रायजेस प्रा.लि.,जळगांव कंपनी सहन करु शकत नाही. करिता मे.मन्साई बॉयोमेडिकल वेस्ट्र एंटरप्रायजेस प्रा.लि.,जळगांव कंपनीला प्रकल्पाची मुदत अल्प असल्याने कमीत कमी १५ वर्ष कालावधी वाढवून मुदतवाढ देण्याची पत्राव्दारे मे.मन्साई बॉयोमेडिकल वेस्ट्र एंटरप्रायजेस प्रा.लि.,जळगांव यांनी विनंती केलेली आहे.

जैविक घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम १९९८ व सुधारीत २००० नुसार जळगांव जिल्हयातील व शहरात निर्माण होणाऱ्या जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावणेसाठी महासभा ठराव क्रं.६६ दि.११/०२/२००५ अन्वये मे.मन्साई बॉयोमेडिकल वेस्ट्र एंटरप्रायजेस प्रा.लि.,जळगांव यांनी सामाईक सुविधा म्हणून प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. कार्यादेश क्रं.५३२ दि.१३/०७/२००५ नुसार दि.०२/०८/२००५ रोजी म.न.पा. करारनामा करुन दिलेला असून जळगांव जिल्हयातील जैविक घनकचरा संकलन प्रत्यक्षात दि.१८/०७/२००६ पासून सुरु करण्यात आलेले आहे. सदर कामाची मुदत दि.०१/०८/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्याने पत्रात दिलेल्या कारणांचा विचार करता सदर कंपनीचा जळालेला प्रकल्प बांधा वापरा व हस्तांतरीत करा या (BOT) तत्वावर दिलेला असल्याने कंपनी सोबत केलेल्या करारनाम्यातील अटी शर्तीनुसार आहे त्या परिस्थितीत एक वर्षानंतर प्रकल्प ताब्यात घेतल्यास म.न.पा.चे आर्थिक हित जोपासले जाणार नाही.

महानगरपालिकेस दि.०२/०८/२००५ रोजी करुन दिलेली संविदा नुसार मे.मन्साई बॉयोमेडिकल वेस्ट्र एंटरप्रायजेस प्रा.लि.,जळगांव यांनी म.न.पा.स करुन दिलेल्या करारनामा मधील अट क्रं.३२ प्रकल्प मुदत संपल्यानंतर करारातील नमुद खुली जागा व प्रकल्प यांना मुदतवाढ दयावयाची झाल्यास महानगरपालिका आयुक्त व आम्ही यांच्यात झालेल्या समझोत्यानुसार मुदतवाढ देण्याबाबत ज्यावेळी म.न.पा.जो निर्णय देईल तो आम्हाला मान्य राहिल. तसेच अतिरिक्त करारनाम्यामधील दि.०२/०८/२००५ रोजी केलेल्या करारनाम्यामध्ये १ ते ३३ अटी शर्ती मध्ये खालील अ.क्रं.३४ अट समाविष्ट करण्यात येत आहे. अ.क्रं.३४ वित्तहानी जीवीत हानी, नैसर्गिक आपत्ती झाल्यास त्याबाबतची जबाबदारी करारनामा करुन देण्याऱ्याची राहिल. महानगरपालिका जळगांव यांचेकडून कुठल्याही प्रकारची पैशांच्या स्वरुपी मोबदल्याची मागणी करणार नाही व याबाबत कुठलाही दावा फाटे महानगरपालिकेविरुध्द करणार नाही.

मे.मन्साई बॉयोमेडिकल वेस्ट्र एंटरप्रायजेस प्रा.लि.,जळगांव यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने नव्याने प्रकल्प उभारणी करणेसाठी १ ते १.५ कोटी खर्च अपेक्षीत असून त्या कामी कमीत कमी १५ वर्षाची मुदतवाढीची मागणी केलेली आहे. परंतू सदर कंपनीस १५ वर्षाची मतुदतवाढ देणे शक्य नसल्यामुळे ५ ते ७ वर्ष मुदतवाढ दिल्यास प्रकल्प पुन्हा कार्यान्वीत करुन नव्याने सुधारीत संविदा (करारनामा) करणे योग्य होईल. त्यामुळे भविष्यात कार्यान्वीत प्रकल्प ताब्यात घेतल्यास म.न.पा.चे आर्थिक हित जोपासले जाईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) नुसार आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेचया मालकीची कोणतीही स्थावर व जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाडयाने देता येईल किंवा अन्यथा अधिहस्तांतरीत करता येईल, महानगरपालिकेच्या मालकीची स्थावर मालमत्ता किंवा तिचा कोणताही हक्क जाहिर लिलावाची रितसर कार्यध्दती अनुसरुन या कलमाच्या तरतूदीनुसार पट्टयाने देण्यात आला असेल किंवा अन्यथा हस्तांतरीत करण्यात आला असेल, तर शासनाने याबाबतीत तयार केलेल्या नियमानुसार स्थावर मालमत्तेच्या उक्त पट्टयाने तद्नंतर नुतनीकरण करणे किंवा हस्तांतरण करणे, महानगरपालिकेसाठी कायदेशीर असेल.

प्रस्तुत जैव-वैदयकिय कचऱ्याची विल्हेवाट लावणे ही शासन नियमानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाची जबाबदारी असल्याने या संदर्भात जिल्हास्तरीय सल्लागार समितीच्या निर्णयाचे अनुषंगाने जळगांव शहर व जळगांव जिल्हयातील नागरीक क्षेत्रातील जैविक - जैव वैदयकिय कचऱ्याची विल्हेवाट लावणे व प्रक्रिया करणे कामी जळगांव महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या जागेवर महासभेच्या ठराव व मान्यतेने करारनामा करणेत येवून प्रक्रिया प्रकल्प उभारणेत आलेला होता. करारनाम्याच्या अटी शर्तीनुसार व अटी शर्तीला अधीन राहून सदर कराराची मुदत ही कार्यादेशाच्या दिनांकापासून २० वर्षाच्या कालावधीसाठी होती (दि.१३/०७/२००५ ते १३/०७/२०२५) सदर प्रकल्प बांधकाम पुर्ण होवून दि.१८/०७/२००६ पासून कार्यान्वीत झालेला आहे.

तथापि दि.०२/०१/२०२४ रोजी सदर प्रकल्पास आग लागल्याने सदर प्रकल्पाचे नुकसान होवून प्रकल्प बंद पडलेला आहे. अजून सदर प्रकल्पाची मुदत संपुष्टात आलेली नाही व करारानुसार जैव वैदयकीय कचऱ्याची विल्हेवाट लावणेची जबाबदारी नियुक्त अभिकर्त्याची असल्याने सदयस्थितीत जिल्हा सल्लागार समितीच्या निर्णयानुसार धुळे येथील प्रकल्पावर विल्हेवाट लावणेत येत आहे. सदर बाब अभिकर्त्यास परवडणारी नसल्याने बंद पडलेला प्रकल्प पुन्हा सुरु करावा लागणार आहे. तथापि कराराचा कालावधी हा अल्प असल्याने (सुमारे १ वर्ष) या अल्प कालावधीसाठी प्रकल्प उभारणीसाठी येणारा खर्च (एक ते दिड कोटी रु.) किफायतशीर नसल्याने प्रकल्प दुरुस्त करणे नव्याने उभारणे कामी मान्यता व सदर प्रकल्प चालविणे करिता वाढीव मुदतीची मागणी अभिकर्ता यांनी केलेली आहे.

जैव-वैदयकिय कचऱ्याची विल्हेवाट व प्रक्रियाची महानगरपालिकेची जबाबदारी कलम ७९ क वरील तरतूदी इ. बाबी विचारात घेता सदर प्रकल्प उभारण्यास मान्यता / परवानगी तसेच ६ वर्षाकरिता मुदतवाढ देणेस मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त,आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२७ (महासभा)**

---

**विषय क्र.:- ०४ प्रशासक ठराव क्र :- १८१ दिनांक :- २७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त,आरोग्य विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./आरोग्य वि./६७२/२०२४-२५ दि.२६/०९/२०२४
३. उपायुक्त (सा.प्र.) यांचा दि.२४/०९/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२४/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत 'Transfer Station' सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) अंमलबजावणी करणे कामी महानगरपालिकेचा हिस्सा पोटी ULB Share (Rs.) रक्कम रु.२,६९,५६,२८२/- इतकी रक्कम १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन किंवा स्वनिधीतुन उभारणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त,आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

शासन निर्णय क्रं.स्वमअ-२०२२/प्र.क्र.६ (शिकाना) / नवि-३४ दि.१४/०२/२०२३, स्वच्छ महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) यांचेकडील पत्र क्रं.जा.क्र.स्वमअ २.०/टि.एस./२४ दि.११/०४/२०२३ रोजीचे पत्र व महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ भारत मिशन यांचेकडील एम.यु.डी.एम.एस./एसएमएम/१४१० दि.२४ फेब्रुवारी २०२३ रोजीची Empanelment Order नुसार स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेस CSWAP (Ciy Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक 'Transfer Station' सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी महासभा ठराव क्रं.११७३ दि.०७/०७/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली असून सदर ठरावाच्या अनुषंगाने All India Institute of Local Self Government, Nashik यांना दि.२५/०७/२०२३ रोजी केलेली संविदा व दि.२७/०७/२०२३ रोजी दिलेले कार्यादेश देण्यात आलेला आहे.

All India Institute of Local Self Government, Nashik यांनी म.न.पा.कडेस दि.१८/०४/२०२४ रोजी 'Transfer Station' करिता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सादर केलेले आहे. All India Institute of Local Self Government, Nashik यांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेस CSWAP (Ciy Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक 'Transfer Station' सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) जळगांव म.न.पा.कडेस सादर केलेला आहे.

मुख्य अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ, प्रादेशिक विभाग, नाशिक यांना जा.क्र./आरोग्य/१५६ दि.३०/०५/२०२४ रोजी सदर अहवालास तांत्रिक छाननी करुन तांत्रिक मान्यता मिळणेस पत्र देण्यात आलेले होते. सदर पत्राच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडील जा.क्र./मजीप्रा/नाशिक/चिशा/१६३१/२०२४ दि.२६/०६/२०२४ रोजी दिलेली तांत्रिक मंजूरीनुसार जळगांव शहर महानगरपालिकेस तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

महासभा ठराव क्र.१३४ दि.१९/०७/२०२४ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेच्या (Ciy Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक 'Transfer Station' च्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मान्यतेसाठी तसेच प्रकल्पाच्या अंदाजपत्रकीय खर्चास रु.८,९९,८६,७०८/- (१८%GST, १%MJP TS Frrs, PMC charges २.६५% est सह) प्रशासकिय मान्यता व राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) यांचेकडील राज्यस्तरी तांत्रिक समितीकडून प्रशासकीय मंजूरी घेणे कामी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सदरचा 'Transfer Station' सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) शासनाकडेस पाठविण्यायत आलेला असून शासन निर्णय क्रं.स्वमअ-२०२४/CN८४३७१०/नवि-३४, मंत्रालय मुंबई दि.२४ सप्टेंबर २०२४ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास प्रशासकिय मान्यता देणेबाबत शासनाने नमुद केलेल्या अटी शर्तीच्या अधीन राहून खालीलप्रमाणे 'Transfer Station' सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

| Sr.No. | Component | MoHUA Approved CSWAP | | Approved Proposal | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Qty TPD | Amount (Rs.) | Qty TPD | Total Cost (Rs.) | Central Share (Rs.) | State Share (Rs.) | ULB Share (Rs.) | Additional Cost / (Saving Rs.) |
| 1. | Transfer Station @ Rs.4.5 lakh/TPD | 250 | 11,25,00,000 | 250 | 8,98,54,274 | 2,96,51,911 | 3,32,46,082 | 2,69,56,282 | (2,26,45,726) |
| | Total | | 11,25,00,000 | | 8,98,54,274 | 2,96,51,911 | 3,32,46,082 | 2,69,56,282 | (2,26,45,726) |

'Transfer Station' सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) Total Cost (Rs.) रक्कम रु.८,९८,५४,२७४/- इतकी असून Central Share (Rs.) रक्कम रु.२,९६,५१,९११/- State Share (Rs.) रक्कम रु.३,३२,४६,०८२/- निधी शासनाकडून प्राप्त होणार असल्याने महानगरपालिकेचा हिस्सा पोटी ULB Share (Rs.) रक्कम रु.२,६९,५६,२८२/- इतकी रक्कम म.न.पा.ला दयावी लागेल.

शासन निर्णय क्रं.स्वमअ-२०२२/प्र.क्र.७३/नवि-३४ मंत्रालय, मुंबई दि.१५ जुलै २०२२ नुसार पान क्रं.०५ वरील अ.क्रं.३.१२ योग्य परिणाम साध्य करण्यासाठी १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानाचा (बंधित व अबंधित) लाभ घेणे.:- राज्ये/केंद्र शासित प्रदेश आणि शहरांनी अभियानाच्या परिमाणांची पूर्तता करण्यासाठी स्वच्छ भारत अभियान २.० (नागरी) करिता प्राप्त होणाऱ्या निधी व्यतिरिक्त १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानाचा लाभ घेता येईल. असे नमुद आहे.

त्यानुसार महानगरपालिकेच्या हिस्सा पोटी ULB Share (Rs.) रक्कम रु.२,६९,५६,२८२/- इतकी रक्कम १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन किंवा स्वनिधीतुन उभारणेकामी मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त,आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२७** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र :- १८२** **दिनांक :- २७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./बांधकाम/१२२९/२०२४-२५ दि.२६/०९/२०२४

३. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.२३/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात विकास योजने अंतर्गत शहरातील ०१ ते ०६ विकास कामे शासन निर्णयानुसार सार्वजनीक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करण्या बाबत मान्यता देणे.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

उपविभागीय अधिकारी सार्व.बांधकाम उपविभाग,जळगांव यांचे पत्र क्रं.साबांउविज/प्रशा/१३८६/२०२४ दि.१३/०९/२०२४ चे पत्र प्राप्त झाले त्यानुसार खाली नमुद ०१ ते ०६ कामे हे जळगांव महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजने अंतर्गत सन २०२४-२५ या वर्षासाठी शासन निर्णय क्रमांक/मनपा/२०२४/प्र.क्र.-३२८ (३१) नवि-१६ (ई ८२३५०९) मंत्रालय, मुंबई दि.२९ ऑगस्ट २०२४ अर्थसंकल्पात मंजुर झालेले असल्याचे पत्रात नमुद आहे. त्या अनुषंगाने सार्व.बांधकाम विभागाने महानगरपालिकेकडुन ना-हरकत प्रमाणपत्र व ठराव मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | प्रभाग क्र.१३ जळगांव येथिल नागेश्वर कॉलनी परिसरातील गट नं.४६६/२+३ व ४६६/१ येथे रस्ता कॉक्रिटीकरण करणे. |
| २. | प्रभाग क्र.१३ जळगांव येथिल रायसोनी नगर मोहाडी रोड जवळील परिसरातील गट नं.४५६/०२ व ४५८/१ अ येथे रस्ते कॉक्रिटीकरण करणे. |
| ३. | प्रभाग क्र.१३ जळगांव येथील राम लक्ष्मण नगर परिसरातील गट नं.४५३ येथे रस्ता कॉक्रिटीकरण करणे. |
| ४. | प्रभाग क्र.१३ जळगांव येथिल गट नं.४६६/४ गणेश साडी सेंटर पासुन समर्थ नगर कॉर्नर पर्यंत रस्ते कॉक्रिटीकरण करणे. |
| ५. | प्रभाग क्र.१३ जळगांव येथिल गजानन एंटरप्राइजेस नारायणी पार्क परिसरातील गट नं.४६६/५+४ येथे रस्ते कॉक्रिटीकरण करणे. |
| ६ | प्रभाग क्र.१३ जळगांव येथिल विवेक कॉलनी परिसरातील गट नं.४६६/७+८ येथे रस्ता कॉक्रिटीकरण करणे. |

उक्त ०१ ते ०६ कामांना सार्व.बांधकाम विभाग यांच्या मागणी नुसार कामांना ना-हरकत दाखला खाली नमुद अटी शर्तीच्या अधिन राहुन देण्यास व ०१ ते ०६ कामे सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांच्या मार्फत करण्याबाबत महासभा/प्रशासक यांची मान्यता होवुन ठराव पारित होणेकरीता प्रस्ताव सभेपुढे सादर करण्यात आलेला आहे.

१. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद कामाची जागा मनपा कब्जेवहीवाटीतील आहे.

२. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद काम आपल्या कार्यालयाकडून पूर्ण झाल्यानंतर मनपाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर कामाची दोष दायीत्व पुर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल व दुरुस्ती मनपा जळगांव मार्फत करण्यात येईल.

३. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद प्रस्तावित केलेले काम कोणत्याही योजनेतुन मंजुर अथवा प्रस्तावित नाही.

४. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद प्रस्तावित केलेल्या कामांची जागा अतिक्रमण विरहीत आहे.

५. ज्या रस्त्यांवर भुमिगत गटारींचे काम झालेले नाही अश्या रस्त्यांच्या कॉक्रीटीकरणाच्या प्रस्तावात सदर रस्त्यावर भविष्यात भुमिगत गटारीसाठी खोदकाम करण्यात येणार असलेने त्यासाठी रस्त्यांचे नुकसान होणार नाही अश्या प्रकारचे नियोजन करणे व त्याकरीता आवश्यक बाबींचा समावेश अंदाजपत्रकीय प्रस्तावात करणे आवश्यक राहील.

६. रस्त्यावर मलनिस्सार योजनेचे असलेली मुख्य चेंबर व घरजोडणी चेंबर कोणत्याही परिस्थितीत रोड खाली दबाई होणार नाही याची दक्षता घ्यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार पाणी पुरवठा व मलनिस्सारण सेवा अत्यावश्यक सेवेत समाविष्ट असल्याने अशी कृती नियमांचे उल्लंघन करणारी ठरेल. रत्याखाली दबाई झाल्यास आपण नियुक्त केलेले मक्तेदार यांनी तात्काळ स्वखर्चाने पुर्ववत व सुस्थितीत करण्याचे नियोजन ठेवणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.

७. सदर रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्यासाठी रोड स्क्रपींग करणे, खोदकाम करणे, हि कामे करीत असतांना जलवाहीनीची अथवा नागरीकांचे नळ संयोजनचे कोणतेही नुकसान झाल्यास, तुट फुट झाल्यास, त्याची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक राहील.

८. रस्त्याचे काम करतांना त्या रस्त्यावरील भुमिगत मलनिस्सारण योजनेची चेंबर असल्यास त्याची तुट फुट होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील, तसेच सदर चेंबर रस्त्याच्या पृष्टभागाशी समतल करणे आवश्यक राहील व त्यासाठी अंदाजपत्रकात देखिल तरतुद करणे आवश्यक राहील.

प्रस्तावातील कोणत्याही रस्त्याचे काम सुरु करण्यापुर्वी सात दिवस आधी सुचित करणे आवश्यक राहील, त्यामुळे त्या रस्त्यावरील पाईपलाईन दुरुस्ती नळ संयोजन अथवा इतर आवश्यक कामे मनपा मार्फत पुर्ण करुन घेणे शक्य होईल.

उपरोक्त अटी शर्तीस बंधनकारक राहुन ना-हरकत दाखला देण्यास व तदनंतर सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२७** **(विशेष महासभा)**

**विषय क्र.:- ०६** **प्रशासक ठराव क्र :-१८३** **दिनांक :- २७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./बांधकाम/११९६/२०२४-२५ दि.२३/०९/२०२४

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत शहरातील विकास कामांना मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

सहा.आयुक्त, न.वि.शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव यांचेकडील पत्र क्रं.जा.क्रं./न.वि.शाखा/ न.पा-१/४५२/२०२४ दि.१६/०७/२०२४ अन्वये निधी अनुज्ञेय आदेशानुसार जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थीक वर्षाकरिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेकरीता रक्कम रु.७५३५७६००/- मात्रचा निधी मनपास अनुज्ञेय करण्यात आल्यानुसार सहा.आयुक्त, न.वि.शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव यांचेकडील पत्र क्रं.जा.क्रं./न.वि.शाखा/न.पा-१/५६२/२०२४ दि.१६/०८/२०२४ च्या पत्रानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत खाली नमुद कामांचे अंदाजपत्रक रक्कम रु.१९९५७१२/- मात्रचे साबा विभाग राज्यदर सुची सन २०२३-२४ नुसार तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास शहर अभियंता यांनी TS/PWD/१६६ दि.२०/०९/२०२४ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | तांत्रिक मान्यता जशमनपा पत्र क्रं. व दिनांक | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.११ अंतर्गत पिंप्राळा शिवार गट नं.१५२/४/१+२ डिंगबर हौसिंग सोसायटी परिसर येथे उदयान विकसित करणे. | TS/PWD/१६६ दि.२०/०९/२०२४ | १९९५७१२/- |

वरील कामास प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असल्याने प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता व तसा ठराव प्राप्त झाल्यानंतर मा.जिल्हाधिकारी,जळगांव यांचे कडेस वरील कामांचा प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२७** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०७** **प्रशासक ठराव क्र :- १८४** **दिनांक :- २७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./म.बा.क./९/२०२४-२५ दि.२०/०९/२०२४

३. उपायुक्त (सा.क.) यांचा दि.२०/०९/२०२४ चा अभिप्राय

४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२०/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** सन २०२४-२५ या शालेय वर्षाकरिता जळगांव शहर महानगरपालिका संचलित बालवाडीतील मुलांना पुरक पोषण आहार पुरविणेबाबत.

---

वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका संचलित बालवाडीतील बालकांना सन २०२४-२५ चे शैक्षणिक वर्षो करीता पोषण आहार पुरविणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मनपा महासभा / प्रशासक ठराव क्र.१०९ दि.१९/०७/२०२४ अन्वये ई-निविदा सुचना प्रसिध्दी करुन निविदा मागविणेस मंजुरी देण्यात आलेली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई निविदा सुचना क्र.४९५/२०२४-२५ प्रसिध्द करण्यात येवून त्यास दै.लोकमत,जळगांवचे जिल्हास्तरीय अंकात जाहिर व्यापक प्रसिध्दी दि.२७/०७/२०२४ रोजी देण्यात आलेली होती. परंतु मुदतीत दोन ई निविदा धारकांनी निविदेत सहभाग नोंदविल्याने त्या कामाच्या निविदेस आठ दिवसांची मुदतवाढ देण्यात आलेली होती. तरी देखील दोन निविदा धारकांनी सहभाग नोंदविल्याने निविदा स्पर्धात्मक होणेसाठी कमीत कमी तिन निविदा धारकांचा सहभाग असणे आवश्यक असल्याचे रिपोर्टींग फेर ई निविदा सुचना प्रसिध्दीसाठी महिला व बालकल्याण विभागाकडून रितसर नियमानुसार देण्यात आला होता.

प्रस्तुत प्रकरणी उपायुक्त (सा.क.) यांनी विभागाचा अहवाल पाहता सदर निविदा expression of interest या head खाली तात्काळ प्रसिध्द करुन कार्यवाही करावी असे निर्देश प्रकरणी आदेशीत करण्यात आले त्यास आयुक्त तथा प्रशासक यांनी दि.२८/०८/२०२४ रोजी मान्यता प्रदान केली. त्या अनुषंगाने शासन पत्र क्र.शापोआ-२०२२/प्र.क्र.६४/एस.डी.३ दि.१३ मे २०२२ व महाराष्ट्र शासन शालेय पोषण आहार योजना स्वतंत्र कक्ष प्रा.शिक्षण संचालनालय महाराष्ट्र पुणे / प्र.क्र./क.स्व./मसुदा/२०२२-२३/१११७ दि.१३ मे २०२२ प्रकरणी जोडला असून प्रस्तुत प्रकरणी expression of interest या head खाली तात्काळ ई निविदा सुचना क्र.५१७/२०२४-२५ करीता नव्याने महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली व त्यास पुन्हा व्यापक प्रसिध्दी करीता दै.सकाळ जळगांव चे जिल्हास्तरीतय वृत्तपत्रात दि.२९/०८/२०२४ रोजी प्रसिध्दी देण्यात आली. त्याअनुसरुन expression of interest या head खाली प्रकरणी दोन (२) निविदा धारकांनी सहभाग नोंदविल्याचे दिसून येत असल्याबाबतची Bid Submission completged count प्रत सोबत प्रकरणी जोडून सहभागी दोन निविदा धारकांचा निविदा लिफाफा उघडणेस व सदरील निविदा धारकांच्या दस्तऐवजांची छाननी करणेस व त्याप्रमाणे गुणांकन तक्ता तयार करण्यास निविदा समितीने दि.२०/०९/२०२४ रोजी मान्यता

प्रदान केली. दि.२०/०९/२०२४ चे निविदा समितीच्या मान्यतेने निविदा लिफाफा उघडला असता सदरील दोनही निविदा धारकांच्या दस्तऐवज व गुणांकनाचा तक्ता पाहता सदर निविदेतील पात्र निविदेतील पात्र निविदा धारक लोकशाही महिला गृह उदयोग सह.सोसायटी लि.जळगांव असल्याचे दिसून येत आहे.

एकात्मीक बालविकास सेवा योजनाअंतर्गत राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाने पारीत केलेला शासन निर्णय याचीका २०१९/प्र.क्र.५/का-५ दि.३ एप्रिल २०१९ अन्वये पोषण आहार दर रुपये ८.००/- मात्र असे असून त्यानूसार शासकिय शालेय पोषण आहार अंतर्गत ३ ते ६ वयोगटातील बालकांना ५०० उष्मांक व १२ ते १२५ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहारासाठी प्रति बालक प्रति दिन रुपये ८.०० पैसे मात्रचा आहाराचा दर विहीत करण्यात आलेला आहे. त्याबाबतचा शासन निर्णय आहे. तसेच सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंर्तगत दारिद्र रेषेखालील स्थापन केलेल्या महिला व बालके विकास गटांना पणन सहाय्य उपलब्ध करणेसाठी महानगरपालिका / नगरपरिषदा मधील कामे प्राधान्याने देणेबाबत नगरपरिषद संचनालय परिपत्रक क्र.नपप्रसं/१३/पणन सहाय्य/२००४/प्र.क्र.१०९७ दि.२१/१२/२००४ पारीत झालेला असून त्यात बचत गटांना दयावयाची कामे (शाळेसाठी शालेय पोषण आहार अंतर्गत अन्न शिजविणे / मुलांना देणे व त्या अनुषंगाने येणारी सर्व कामे) अंतर्भुत केली गेलेली आहे. त्या अनुषंगाने महासभा / प्रशासकिय ठराव क्र.१०९ दि.१९/०७/२०२४ मध्ये पात्र बचत गटांचा सुध्दा प्राधान्याने समावेश करावा असे अंतर्भुत करुन ठराव मंजुर करुन पारीत करण्यात आलेला आहे.

त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी ई-निविदा सुचना क्र.५१७/२०२४-२५ मध्ये त्याबाबतींचा समावेश अंतर्भुत करुन सदर www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करुन मागविण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने सदर निविदा प्रक्रियेतील दोनही सहभागी निविदा धारक यांनी दिलेल्या दस्तऐवजांचा व त्याप्रमाणे त्यांचा गुणांकन तक्त्यानुसार तुलनात्मक तक्ता पाहता लोकशाही महिला गृहउदयोग सहकारी संस्था लि.जळगांव यांनी निविदेतील मागणी दस्तऐवजांप्रमाणे पुर्ण दस्तऐवज ऑनलाईन सबमीट करुन त्याची पुर्तता केलेली आहे व साई मल्टी सर्व्हीसेस जळगांव यांनी निविदा अटी प्रमाणे अपुर्ण दस्तऐवजांची ऑनलाईन पुर्तता केलेली आहे. म्हणजे त्यांनी पूर्ण दस्तऐवजांची पुर्तता निविदा अटी प्रमाणे केलेली नाही. तसेच दोनही निविदा धारकांचा गुणांकन तक्ता पाहता लोकशाही महिला गृह उदयोग सहकारी संस्था लि.जळगांव यांना एकूण ८४ गुण प्राप्त झालेले आहे व साई मल्टी सर्व्हीसेस,जळगांव यांना ५८ गुण प्राप्त झालेले आहे. म्हणजे त्यांना सर्वात कमी गुणांकन मिळालेले आहे. त्यानुसार सदर निविदेतील पात्र निविदा धारक लोकशाही महिला गृह उदयोग सहाकरी संस्था लि.जळगांव यांची निविदा मंजूर होणेस व त्याप्रमाणे त्यांना कार्यादेश देणेकामी व त्याप्रमाणे त्यांची संविदा करणेकामी तसेच सन २०२४-२५ चे मनपा अर्थ संकल्पात महिला व बाल कल्याणासाठी दोन कोटी निधीची तरतूद करण्यात आलेली असून त्यातून सदर पोषण आहाराच्या बिल अदायगीचा खर्च करणेस मान्यता मिळण्यासाठी अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२७** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०८** **प्रशासक ठराव क्र :- १८५** **दिनांक :- २७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./म.बा.क./१०/२०२४-२५ दि.२४/०९/२०२४

३. उपायुक्त (सा.क.) यांचा दि.२४/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** महिला व बालकल्याणाच्या कार्यक्रमासाठी शासन निर्णयाप्रमाणे महानगरपालिकेमध्ये १ ते २३ योजना / उपक्रम राबविणे संदर्भात.

---

वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

शासन निर्णय क्र.जी.ई.एन.-१०९३/१९९२/नवि-१४ दि.३०/०६/१९९२ नुसार महिला व बालकल्याणाच्या कार्यक्रमासाठी महानगरपालिका /नगरपालिकेने त्यांच्या अर्थ संकल्पात तरतूद केलेल्या वार्षिक महसूली उत्पन्नातील बांधील खर्च वजा जाता उर्वरीत रकमेच्या ५ टक्के निधी राखून ठेवावा असे निर्देश करण्यात आलेले होते.

शासन निर्णय क्र.एमयुएम/२०२१/प्र.क्र.३८५/नवि-१७ दि.२९ मार्च २०२२ नुसार महिला व बालकल्यासाठी महानगरपिालकेच्या वार्षिक एकूण उत्पन्नापैकी बांधील खर्च वजा जाता राहिलेल्या निव्वळ महसूलातील ५% रकमेमधून राबवावयाच्या महिला व बाल कल्याणासाठीच्या असलेल्या योजना/ कार्यक्रम / कामे राबविणेस शासनाने मान्यता दिलेली आहे. यापुर्वी महासभा ठराव क्र.६९२ दि.१५/१२/२०२२ अन्वये महानगरपालिके मार्फत महिला व बालकल्याण विभागामार्फत १ ते १५ उपक्रम राबविण्यात येत होते, परंतु उक्त नमूद शासन निर्णयातील निर्देशानुसार तसेच सुचनेनुसार महिला व बालकल्याणाच्या संबंधीत उपक्रम / योजनेत सुधारणा करणे तसेच अतिरिक्त योजना / उपक्रमांचा समावेश करून त्यानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक होते, त्यानुसार उक्त शासन निर्णयातील निर्देशंचा व सुचनांचा अभ्यासपुर्ण विचार करून १ ते २३ योजना / उपक्रमांचा आराखडा तयार करण्यात आलेला होता, सदर योजनांचा / उपक्रमांचा आराखडा मान्यतेसाठी व त्यानुसार योजना / उपक्रम राबविणेकामी प्रस्ताव सभेसमोर मान्यतेकरीता पाठविण्यात आलेला होता. त्यास म.न.पा. सभा ठराव क्र.११७२ दि.०७/०७/२०२३ अन्वये सदर ठरावात नमूद केलेल्या १ ते २३ योजनांचा / उपक्रमांचा आराखडा राबविण्यास मंजूरी प्रदान करण्यात आलेली. त्या अनुषंगाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता म.न.पा.अर्थ संकल्पीय अंदाजपत्रकात महिला व बालकल्याणाकरीता असलेल्या योजना / कार्यक्रम / कामे राबविणेसाठी ५% राखीव निधीची तरतूद करण्यात आलेली आहे, तथापी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात देखील, शासन निर्णय क्र.एमयुएम/२०२१/प्र.क्र.३८५/नवि-१७ दि.२९ मार्च २०२२ नुसार आवश्यक बाबींवर खर्च करणे ('अ' नुसार अंतर्भुत असलेली) तसेच म.न.पा.सभा ठराव क्र.११७२ दि.०७/०७/२०२३ मध्ये नमूद केलेल्या अनुक्रमे १ ते २३ योजना / उपक्रमांचा आराखडा / उपक्रम / कामे राबविणेस त्याप्रमाणे खर्च १ ते २३ योजनांवर आराखडयात नमूद केल्याप्रमाणे खर्च महिला व बालकल्याण विभागामार्फत करणेकामी योग्य त्या धोरणात्मक निर्णयाकामी सदरचा प्रस्ताव महासभा / प्रशासकिय मान्यतेस्तव सादर.

तसेच म.न.पा.संचलित प्राथमिक व माध्यमिक शाळा परिसरात शालेय विदयार्थ्यांच्या विशेषत: मुलींच्या सुरक्षीतेतेसाठी उपायोजनांबाबत संदर्भ क्र.१ अन्वये शासन निर्णय निर्गमीत करण्यात आलेले आहेत, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र./सुरक्षा-२०२४/प्र.क्र./२०४३/एसडी-४/दि.२१/०८/२०२४ चे निर्णयाचे अनुषंगाने आयुक्त तथा प्रशासक यांचे दि.२६/०८/२०२४ चे आढावा बैठकीतील सुचना वजा निर्देश आदेशानुसार खालील कामे प्रशासन अधिकारी शिक्षण विभागाकडील मागणीनुसार म.न.पा.शाळेतील विदयार्थ्यांचे शैक्षणिक व बौध्दिक क्षमता वर्धनाकरीता, म.न.पा.शाळांची गुणवत्ता वाढविण्याकरीता प्रस्तावित 'ब' मधील १ ते ३ कामे करणे तसेच शाळेतील मुलांकरीता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व सदर विदयार्थ्यांकरीता क्रिडा साहित्य उपलब्ध करुन देणे इत्यादी कामे आवश्यक आहे. व शहर अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच विदयुत अभियंता विदयुत विभाग यांचे मागणी प्रतिवेदनाप्रमाणे कामाचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अंदाजीत खर्च येणारा अपेक्षीत आहे. सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात अतिरिक्त अंदाजपत्रकीय निधीची तरतुद करणे इ.बाबत आवश्यक कार्यवाही करणेकामी महासभा/प्रशासक ठराव करणे आवश्यक आहे.

१) प्रशासन अधिकारी यांचे मागणी प्रतिवेदनाप्रमाणे म.न.पा.शाळानिहाय यादीतील अनुक्रमे नमूद केल्याप्रमाणे शाळा परिसरात सीसीटीव्ही खरेदी करुन बसविणेकामी येणारा अंदाजीत अपेक्षीत खर्च रक्कम रु. २० लाख
२) विदयुत अभियंता व शहर अभियंता यांचे मागणी प्रतिवेदनाप्रमाणे म.न.पा.शाळानिहाय किरकोळ विदयुत फिटींग, फॅन, टयुबलाईट व इतर दुरुस्तीची कामे करुन घेणेकामी येणारा अपेक्षीत खर्च रक्कम रु. ४,९३,९१८/-
३) कनिष्ठ अभियंता व शहर अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे मागणी प्रतिवेदनानुसार म.न.पा.शाळानिहाय यादीतील अनुक्रमे नमूद केल्याप्रमाणे शाळा दुरुस्ती करीता अंदाजीत अपेक्षीत खर्च अंदाजपत्रकाप्रमाणे रक्कम रु. १ कोटी ५० लाख

करीता वर अनुक्रमे १ ते ३ करीता एकूण खर्च रुपये १,७४,९३,९१८/- इतका येणार आहे.

परंतु सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता महिला व बालकल्याणाकरीता आराखडयाप्रमाणे १ ते २३ योजना / उपक्रम महिला व बालकल्याणाकरीता राबविणे एकूण दोन कोटी खर्चाची तरतूद म.न.पा अंदाजपत्रकात सन २०२४-२५ मध्ये महिला व बालकल्याण या लेखा शिर्षकाखाली शिल्लक आहे. तथापी जर शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र./सुरक्षा-२०२४/प्र.क्र./२०४३/एसडी-४ दि.२१/०८/२०२४ चे निर्णयाचे अनुषंगाने आयुक्त तथा प्रशासन यांचे दि.२६/०८/२०२४ चे आढावा बैठकीतील सुचना वजा निर्देश आदेशानुसार उक्त नमुद कामे सुध्दा करावयाची झाल्यास त्याकरीता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी अतिरिक्त तरतुद एकूण रुपये १,७४,९३,९१८/- पुरवणी अंदाजपत्रकात करुन घेण्यास हरकत नाही. तरी सदरची उक्त नमूद अ.क्र.१ ते ३ ची कामे व त्यासाठी येणारा खर्च महिला व बालकल्याण विभागामार्फत करणेकरीता मान्यता मिळण्यासाठी अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२७** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०९** **प्रशासक ठराव क्र :- १८६** **दिनांक :- २७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./म.बा.क./११/२०२४-२५ दि.२४/०९/२०२४

३. उपायुक्त (सा.क.) यांचा दि.२४/०९/२०२४ चा अभिप्राय

४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२४/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणाकरीता शासनामार्फत वेळोवेळी शासन निर्णय पारीत करण्यात आल्याप्रमाणे योजना अनुक्रमे क्र.१ ते १७ राबविणे संदर्भात.

---

वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणाकरीता शासनामार्फत वेळोवेळी शासन निर्णय पारीत करण्यात आलेले आहेत. त्यानुसार दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणाकरीता तसेच दिव्यांग व्यक्तींना दैनंदिन जिवनात येणाऱ्या अडीअडचणींची तिव्रता कमी करण्याच्या हेतुने योजना क्र.१ ते १७ सविस्तर आराखडा तयार करण्यात येवून तो सन २०२३-२४ करीता महासभेच्या मान्यतेस्तव धोरणात्मक निर्णय घेणेकामी पाठविण्यात आलेला होता. म.न.पा.सभा ठराव क्र.१११७ दि.३०/०५/२०२३ अन्वये सदर ठरावात नमूद केलेल्या १ ते १७ अनुक्रमे योजना / उपक्रमांचा आराखडयानुसार राबविणेस मंजुरी प्रदान करण्यात आली होती.

त्याअनुषंगाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकयरीता म.न.पा अर्थ संकल्पीय अंदाजपत्रकात दिव्यांगांच्या कल्याणाकरीता असलेल्या योजना / कार्यक्रम / कामे राबविणेकामी ५% राखीव निधी म्हणजे २ कोटीची राखीव तरतुद करण्यात आलेली आहे. त्या तरतुदीनुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात देखील त्याच प्रमाणे म.न.पा.सभा ठराव क्र.१११७ दि.३०/०५/२०२३ मध्ये नमूद केलेल्या प्रमाणे अनुक्रमे १ ते १७ योजना / उपक्रमांचा आराखडा / उपक्रम दिव्यांगांच्या कल्याणाकरीता राबविणेसाठी व त्याप्रमाणे अंदाजपत्रकीय मंजुर खर्च महिला व बालकल्याण विभागामार्फत करणेकामी मान्यता मिळण्यासाठी अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२७** **(महासभा)**

**विषय क्र.:- १०** **प्रशासक ठराव क्र :- १८७** **दिनांक :- २७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./आरोग्य वि./६६८/२०२४-२५ दि.२५/०९/२०२४

३. उपायुक्त यांचा दि.२५/०९/२०२४ चा अभिप्राय

४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२५/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका CSWAP (Ciy Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक 'Transfer Station' प्रकल्पाची उभारणी तसेच वाहने खरेदी करणे बाबत.

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका CSWAP (Ciy Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक Transfer Station सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी महासभा ठराव क्रं.११७३ दि.०७/०७/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली असून सदर ठरावाच्या अनुषंगाने All India Institute of Local Self Government, Nashik यांना दि.२५/०७/२०२३ रोजी केलेली संविदा व दि.२७/०७/२०२३ रोजी दिलेले कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मुख्य अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडील जा.क्र./मजीप्रा/नाशिक/चिशा/१६३१/२०२४ दि.२६/०६/२०२४ रोजी दिलेली तांत्रिक मंजूरी नुसार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ, प्रादेशिक विभाग, नाशिक स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेच्या CSWAP (Ciy Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक 'Transfer Station' च्या सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) प्रकल्पाच्या अंदाजपत्रकीय खर्चास रु.८,९९,८६,७०८/- (१८%GST, १%MJP TS Frrs, PMC charges २.६५% est सह) तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. महासभा ठराव क्र.१३४ दि.१९/०७/२०२४ नुसार राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) यांचेकडील राज्यस्तरी तांत्रिक समितीकडून प्रशासकीय मंजूरी करीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

शासन निर्णय क्रं.स्वमअ-२०२४/CN८४३७१०/नवि-३४, मंत्रालय मुंबई दि.२४ सप्टेंबर २०२४ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास प्रशासकिय मान्यता नुसार शासनाने नमुद केलेल्या अटी शर्तीच्या अधीन राहून स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

मुख्य अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडील जा.क्र./मजीप्रा/नाशिक/चिशा/१६३१/२०२४ दि.२६/०६/२०२४ रोजी दिलेली तांत्रिक मंजूरी नुसार स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेच्या CSWAP (Ciy Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक 'Transfer Station' साठी खालीलप्रमाणे Estimate for Transfer Station नुसार प्रकल्पाची उभारणी करणे व वाहन खरेदी करणे आवश्यक आहे.

| Sr.No | Detail | Cost |
|---|---|---|
| A | Civil Work | |
| 1 | TS-1 Estimate of drain for leachate collection | 2,73,339.00 |
| 2 | TS-1 Estimate of shed and platform | 1,39,42,591.20 |
| 3 | TS-1 Estimate of Lechate Tank | 2,22,012.53, |
| 4 | TS-1 Estimate of Room with Toilet | 9,63,741.67 |
| 5 | TS-1 Estimate of weigh Bridge | 8,21,948.20 |
| 6 | TS-2 Estimate of drain for leachate collection | 2,74,279.88 |
| 7 | TS-2 Estimate of shed and platform | 1,03,77,951.30 |
| 8 | TS-2 Estimate of Lechate Tank | 2,25,700.72 |
| 9 | TS-2 Estimate of Room with Toilet | 9,63,741.67 |
| 10 | TS-2 Estimate of weigh Bridge | 8,21,948.20 |
| 11 | TS-3 Estimate of drain for leachate collection | 2,61,714.16 |
| 12 | TS-3 Estimate of shed and platform | 1,09,75,525.85 |
| 13 | TS-3 Estimate of Lechate Tank | 2,22,012.53 |
| 14 | TS-3 Estimate of Room with Toilet | 9,63,741.67 |
| 15 | TS-3 Estimate of weigh Bridge | 8,21,948.20 |
| | Total (A) | 4,21,32,196.78 |
| B | Maechanical Work | |
| 1 | Refuse Compactor (14Cum)-2Qty | 83,58,146.00 |
| 2 | Refuse Compactor (7Cum)-6Qty | 1,55,84,112.00 |
| 3 | Backhoe loader-3Qty | 75,00,000.00 |
| | Total (B) | 3,14,42,258.00 |
| C | Total Net Amount (A+B) | 7,35,74,454.78 |
| D | 1% MJP Fees | 7,35,744.55 |
| E | 2.65% PMC Charges | 19,49,723.05, |
| F | 18% GST on Net Amount (C) | 1,32,43,401.86 |
| G | 18% GST on Net Amount (D) | 1,32,434.02 |
| H | 18% GST on Net Amount (E) | 3,50,950.15 |
| I | Gross Total (C+D+E+F+G+H) | 8,99,86,708.38 |
| | | |

A- Civil Work अ.क्र. १ ते १५ ई-निविदा प्रक्रिया राबवून B- Maechanical Work अ.क्र. १ ते ३ ऑनलाईन निविदांव्दारे (Online bidding) पध्दतीने GeM पोर्टलवरुन खरेदी करणे अपेक्षीत असून A- Civil Work व B- Maechanical Work मधील प्रकल्पाची उभारणी तसेच वाहने खरेदी करण्यासाठी सर्व करासहित अपेक्षीत खर्च रक्कम रु.८,९९,८६,७०८.३८/-(Ciy Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक 'Transfer Station' मध्ये शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातून तसेच म.न.पा.च्या हिस्सा मधून खर्च करणेस, ई-निविदा सूचना प्रसिध्द करणेस पर्यायी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२७** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ११** **प्रशासक ठराव क्र :- १८८** **दिनांक :- २७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./मा.व्य.वि./२०८४/२०२४-२५ दि.२६/०९/२०२४

३. उपायुक्त (महसुल) यांचा दि.२६/०९/२०२४ चा अभिप्राय

४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.२६/०९/२०२४ चा अभिप्राय

५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२६/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** मनपा मालकीची सि.स.नं.१९३७ (जुनी सानेगुरुजी रुग्णालय जागा) या जागेवर वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर एक वर्षा करीता वाहन तळ चालविणेस देणे कामी अभिकर्ता नेमणूक करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मालमत्ता व्यवस्थापन विभाग अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका मालकीची सि.स.नं.१९३७ (जुनी सानेगुरुजी रुग्णालय जागा) या जागेवर देकार रक्कम रु.२,५०,०००/- एक वर्षा करीता वाहन तळ चालविणे कामी महासभा ठराव क्र.९२३ दिनांक ०७/१०/२०२२ रोजी मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार धनश्री स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्या.जळगांव जिल्हा यांना रक्कम रु.२,५५,०००/- मात्र सर्वोच्च देकार रकमेस स्थायी समिती/प्रशासक ठराव क्र.०५ दि.१३/१०/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली. मनपा अटी-शर्ती नुसार करारनामा करुन कार्यादेश क्र.ज.म.न.पा./जा.क्र./१८७३/मा.व्य./२०२३-२४ दि.१९/१०/२०२३ अन्वये वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर दि.२०/१०/२०२३ पासून एक वर्षा करीता वाहन तळ चालविणे कामी अभिकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

उक्त मक्त्याची मुदत दिनांक १९/१०/२०२४ रात्री १२.०० वाजता पासून संपत असुन प्रस्तुत प्रकरणी सदर मक्त्याची मुदत संपल्यानंतर वाहन तळ चालविणेस देणे कामी मागील सर्वोच्य देकार रक्कम रु.२,५५,०००/- मात्रवर १० टक्के वाढ करुन म्हणजेच रुपये रक्कम रु.२,८०,५००/- मात्र एक वर्षाकरिता देकार रक्कम निश्चित करता येईल.

रुपये रक्कम २,८०,५००/- मात्र देकार निश्चित करणेस व एक वर्षाकरिता वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर चालविणेस देणेस कामीचा प्रस्ताव मान्यतेस सादर. तसेच खरेदी धोरण महाराष्ट्र शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग दि.०१ डिसेंबर २०१६ शासन परीपत्रक प्रकरण क्रमांक ३ खरेदी प्रक्रिया मधील ३.२.३ नुसार जेव्हा खरेदीची किंमत रु. तीन लाख पर्यंत असेल तेव्हा खरेदी दरपत्रक मागवून (खुली स्पर्धात्मक निविदा न मागवता) करता येईल. असे नमुद आहे. परंतु मागील वेळेस सदर प्रकरणी ई-निविदा प्रक्रीया केली होती व त्यानुसार मक्तेदार नियुक्त केला होता. सबब सदर मक्त्याचा दिनांक १९/१०/२०२४ रात्री १२.०० वा. रोजी कालावधी संपत असल्याने ई निविदा प्रसिध्द करणेस व सदयस्थितीत असलेले मक्तेदार धनश्री स्वयंरोजगार सेवा

सह.संस्था मर्या.जळगांव यांना निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो चालु मक्त्याचे देयक रकमेप्रमाणे मुदतवाढ देणेस तसेच सदर कामी ई-निविदा प्रक्रिया करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी मिळकत व्यवस्थापक, मिळकत विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२७** **(महासभा)**

**विषय क्र.:- १२** **प्रशासक ठराव क्र :- १८९** **दिनांक :- २७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./मनपा/सांबा/१२३८/२०२४-२५ दि.२६/०९/२०२४

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधा योजने अंतर्गत सन २०२४-२५ अंतर्गत जळगांव शहरातील १ ते ८५ विकास कामे सार्वजनिक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करण्याबाबत मान्यता देणे.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांचे पत्र क्र.सांबाविज/६२०३/२०२४ दि.२४/०९/२०२४ चे पत्र प्राप्त झाले त्यानुसार खाली नमूद १ ते ८५ कामे हे महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजने अंतर्गत सन २०२४-२०२५ या वर्षासाठी शासन निर्णय क्र.मनपा-२०२४/प्र.क्र. २२८ (३१)/ नवि-१६ (ई-८२३५०९) मंत्रालय, मुंबई- ४०००३२. दि.२९ ऑगस्ट २०२४ मंजूर झालेले असून त्या अनुषंगाने खाली नमूद १ ते ८५ कामांना शासन निर्णयानुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे त्यानुसार वरील प्रमाणे कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांचे दि.२४/०९/२०२४ चे पत्रान्वये १ ते ८५ कामांकरीता ना-हरकत प्रमाणपत्र व प्रशासक ठराव मिळण्या संदर्भात कळविले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १. | प्रभाग क्र.१४ गणपती नगर रोटरी भवन कडे जाणारा रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| २. | प्रभाग क्र.१४ गणपती नगर अडवानी यांच्या घरापासून ते कृष्णा कुटीर इमारत पर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ३. | प्रभाग क्र.१४ कृष्णा कुटीर इमारत पासून ते पी.सी.पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ४. | प्रभाग क्र.१४ गणपती नगर वर्माजी यांच्या घरापासून ते सुमन गृह निर्माण सोसायटी पर्यंत क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ५. | प्रभाग क्र.१४ गणपती नगर गृह निर्माण सोसायटी ते सी.डी.कोल्हे यांच्या घरापर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ६. | प्रभाग क्र.१४ गणपती मंदिर रोड पासून ते विजय वर्मा यांच्या घरापर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ७. | प्रभाग क्र.१४ विजय वर्मा यांच्या घरापासून ते पंजवाणी यांच्या घरापर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ८. | प्रभाग क्र..१४पंजवाणी यांच्या घरापासून ते आर.एन.पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ९. | प्रभाग क्र.१४ लंडन कॅफे पासून ते राजु अडवानी यांच्या घरापर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| १०. | प्रभाग क्र.१४ राजु अडवानी यांच्या घरापासून ते पारसमल चोरडीया यांच्या घरापर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ११. | प्रभाग क्र.१४ फॅड कलेक्शन ते मनीष अग्रवाल यांचे घरापर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| १२. | प्रभाग क्र.१४ मनिष अग्रवाल ते नंदुरबार मिरची पर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| १३. | प्रभाग क्र.१४ नंदुरबार मिरची ते मनीष पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| १४. | प्रभाग क्र.१४ मनीष पाटील यांच्याघरापासून ते मनपा विद्युत विभाग पर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| १५. | प्रभाग क्र.१४ मनपा विभाग पासून ते प्यारपाणी यांच्याघरापर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| १६. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी अमर ड्रायफ्रुट ते संजय मतवाणी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| १७. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी संजय मतवाणी ते किंगरानी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| १८. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी किंगरानी ते विजय लुल्ला यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |

| | |
|---|---|
| १९. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी विजय लुल्ला ते लर्नस अंकडमी पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| २०. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी लर्नस ॲकडमी ते हसवानी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| २१. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी हसवानी ते अम्मा बिल्डींग पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| २२. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी अम्मा बिल्डींग ते अशोक मंधान यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| २३. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी अशोक मंधान ते कल्पना चौक पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| २४. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी कल्पना चौक ते गोपाल मखेजा यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| २५. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी गोपाल मखेजा ते राजु महाराज यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| २६. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी राम चाट भंडार ते संतोषी माता मंदिर पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| २७. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी खेली मखवानी ते प्रविण जोशी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| २८. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी प्रविण जोशी ते ललित कानडे यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| २९. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी ललित कानडे ते दिपक जोशी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ३०. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी सुरेश छाजेड ते भरत जोशी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ३१. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी भरत जोशी ते उमेश जोशी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ३२. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी संतोष भोजने ते राजु भोजने यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ३३. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी हिरा शिंदे ते प्रविन चितारे यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ३४. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी अनिल दोरकर ते इशांत गोरादे यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ३५. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी संतोष केशवानी ते संतोष उदासी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ३६. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनी संतोष उदासी ने समाधा बिल्डींग पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता जि. जळगांव |
| ३७. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनी किंगरानी ते सचपाल कुकरेजा यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ३८. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनी इच्छा पॅलेस ते खेमचंद वालेचा यांचे घरा पर्यंत रस्ता काक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ३९. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनी खेमचंद वालेचा ते वाणी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ४०. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनी वाणी ने डां मुंडे यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता जि. जळगांव |
| ४१. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनी प्रकाश सायकल स्टोअर ते वालेचा यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करण ता. जि. जळगाव |
| ४२. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनी ध्रुव परेडाईज ते स्वामी धेरीपी सटर पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ४३. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनो स्वामी थेरीपी सेंटर ते दत्त कृपा बिल्डींग पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता जि. जळगाव |
| ४४. | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी पूजा पार्लर ते संजय मोरे यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ४५. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनी जोशी नाना ते संजय तायडे यांचे घरा पर्यंत रस्ताकांक्रीटकरणकरणे ता. जि. जळगांव |
| ४६. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनी पुतानी निवास ते अशोक जोशी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ४७. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनो किरण जोशी ते तड्वो हवलदार यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणं ना नि जळगांव |
| ४८. | प्रभाग क्र.१६ सिथी कॉलनी मोहन गरज ते नाना जोशी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रोटकरण करणे ता. जि. जळगाव |
| ४९. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनी ओमकार भवन ते महादेव मंदिर पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता जि जळगांव |
| ५०. | प्रभाग क्र.१६ सिधी कॉलनी साई लॉन्डी ते गुजराची वेल्डोग पर्यंत रस्ता कांक्रोटकरण करणेता. जि. जळगाव |
| ५१. | प्रभाग क्र.१४ प्यारपाणी ते गुरुनानक सोसायटी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ५२. | प्रभाग क्र.१४ गुरुनानक सोसायटी ते गणपती नगर मुख्य रस्तापर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ५३. | प्रभाग क्र.१४ गुरुनानक सोसायटी समोरील रस्तापर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ५४. | प्रभाग क्र.१४ गुरुनानक सोसायटी मागील रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ५५. | प्रभाग क्र.१४ गुरुनानक सतसंग हॉल ते मंदीर पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. |
| ५६. | प्रभाग क्र.१४ मंदीर ते प्रेम प्रकाश आश्रम पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ५७. | प्रभाग क्र.१४ प्रेम प्रकाश आश्राम ते सी एन चौधरी यांचे घरा पर्यंत रस्ता कांक्रीटकरण करणे ता. जि. जळगांव |
| ५८. | प्रभाग क्र १३ जळगाव येथील नागेश्वर कॉलनी परिसरातील गट नं ४६६/२+3 व ४६६/१ येथे रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ५९. | प्रभाग क्र १३ जळगाव येथील रायसोनी नगर मोहाडी रोड जवळील परिसरातील गट नं ४५६/२ व ४५८/१अ येथे रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे |
| ६०. | प्रभाग क्र १३ जळगाव येथील राम लक्ष्मण नगर परिसरातील गट नं ४५३ येथे रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे |

| | |
|---|---|
| ६१. | प्रभाग क्र १३ जळगाव येथील गट नं ४६६/४ गणेश साली सेंटर पासून समर्थ नगर कॉर्नर पर्यंत रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे |
| ६२. | प्रभाग क्र १३ जळगाव येथील गजानन एंटरप्राइस नारायणी पार्क परिसरातील गट नं ४६६/५+४ येथे रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे |
| ६३. | प्रभाग क्र १३ जळगाव येथील विवेक कॉलनी परिसरातील गट नं ४६६/७+८ येथे रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे |
| ६४. | प्रभाग क्र १७ अंतर्गत ऑटो नगर येथील रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे |
| ६५. | प्रभाग क्र.१२ अंतर्गत पोस्टल कॉलनी अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे. |
| ६६. | प्रभाग क्र.१२ अंतर्गत लक्ष्मी नगर अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे |
| ६७. | प्रभाग क्र.१२ अंतर्गत पार्वती नगर अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे |
| ६८. | प्रभाग क्र.१२ अंतर्गत श्रद्धा कॉलनी अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे |
| ६९. | प्रभाग क्र.१२ अंतर्गत स्टेट बँक कॉलनी अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे |
| ७०. | प्रभाग क्र.१२ अंतर्गत व्यंकटेश कॉलनी अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे. |
| ७१. | प्रभाग क्र ८ अंतर्गत निमखेडी शिवार गट नं ७४ येथील रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ७२. | प्रभाग क्र ८ कोल्हे नगर गट नं २५ गीताई अपार्टमेंट पासून ते संजय बडगुजर यांच्या घरापर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ७३. | प्रभाग क्र ८ अंतर्गत गट नं ९९ सह्याद्री कॉलनी परिसरातील रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ७४. | प्रभाग क्र ८ अंतर्गत गट नं ११८/४/२ द्वारका नगर येथील दत्त लॉड्री जवळ रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ७५. | प्रभाग क्र ८ अंतर्गत गट नं २७ साई विहार कॉलनी येथील रस्ते तयार करणे. |
| ७६. | प्रभाग क्र ८ अंतर्गत निमखेडी शिवार गट नं ११८ मधील स्वप्नील पाटील यांच्याघराजवळ रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ७७. | प्रभाग क्र ८ अंतर्गत निमखेडी शिवार गट नं ११८ मधील गायत्री पाटील यांच्या घराजवळील रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ७८. | प्रभाग क्र ८ अंतर्गत निमखेडी शिवार गट नं ११८ मधील श्री अपार्टमेंट रस्ते क्रॉक्रीटीकरण करणे. |
| ७९. | प्रभाग क्र ८ अंतर्गत निमखेडी शिवार द्वारका नगर मोबाईल टावर जवळील रस्त्याचे क्रॉक्रीटीकरण करणे |
| ८०. | प्रभाग क्र ८ अंतर्गत निमखेडी शिवार द्वारका नगर येथील प्रजापिता ब्रह्मकुमारी स्वाध्याय भवन जवळील रस्त्याचे क्रॉक्रीटीकरण करणे |
| ८१. | प्रभाग क्र ८ अंतर्गत निमखेडी शिवार द्वारका नगर स्वामी समर्थ कॉलनी जवळील रस्त्याचे क्रॉक्रीटीकरण करणे |
| ८२. | प्रभाग क्र ८ अंतर्गत निमखेडी शिवार द्वारका नगर डॉ प्रमोद ठाकूर दवाखान्यासमोर रस्त्याचे क्रॉक्रीटीकरण करणे |
| ८३. | प्रभाग क्र.१०, गट नं.३३९/२ब /२क /२ ड/ १/ प्लॉट नं.८, ९, १० येथे चेनलिंक फेन्सिंग व सुशोभीकरण करणे. |
| ८४. | प्रभाग क्र.१० कँडी फॅक्टरी पासून ते त्रिविक्रम मठापर्यंत रस्ता तयार करणे. |
| ८५. | प्रभाग क्र.९ पिंप्राळा शिवार येथील गट नं.९/२/१क /३ शंकरआप्पा नगर येथील ओपनस्पेस येथे सभागृह बांधणे. |

उक्त ०१ ते ८५ कामांना सार्व.बांधकाम विभाग यांच्या मागणीनुसार कामांना ना-हरकत दाखला खाली नमुद अटी शर्तीच्या अधिन राहुन देण्यास व ०१ ते ८५ कामे सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांच्या मार्फत करण्याबाबत मान्यता होवुन ठराव पारित होणेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

१. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद कामाची जागा मनपा कब्जेवहीवाटीतील आहे.
२. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद काम आपल्या कार्यालयाकडून पूर्ण झाल्यानंतर मनपाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर कामाची दोष दायीत्व पुर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल व दुरुस्ती मनपा जळगांव मार्फत करण्यात येईल.
३. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद प्रस्तावित केलेले काम कोणत्याही योजनेतुन मंजुर अथवा प्रस्तावित नाही.
४. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद प्रस्तावित केलेल्या कामांची जागा अतिक्रमण विरहीत आहे.
५. ज्या रस्त्यांवर भुमिगत गटारींचे काम झालेले नाही अश्या रस्त्यांच्या कॉक्रीटीकरणाच्या प्रस्तावात सदर रस्त्यावर भविष्यात भुमिगत गटारीसाठी खोदकाम करण्यात येणार असलेने त्यासाठी रस्त्यांचे नुकसान होणार नाही अश्या प्रकारचे नियोजन करणे व त्याकरीता आवश्यक बाबींचा समावेश अंदाजपत्रकीय प्रस्तावात करणे आवश्यक राहील.
६. रस्त्यावर मलनिस्सार योजनेचे असलेली मुख्य चेंबर व घरजोडणी चेंबर कोणत्याही परिस्थितीत रोड खाली दबाई होणार नाही याची दक्षता घ्यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार पाणी पुरवठा व मलनिस्सारण सेवा अत्यावश्यक सेवेत समाविष्ट असल्याने अशी कृती नियमांचे उल्लंघन करणारी ठरेल. रस्ताखाली दबाई झाल्यास आपण नियुक्त केलेले मक्तेदार यांनी तात्काळ स्वखर्चाने पुर्ववत व सुस्थितीत करण्याचे नियोजन ठेवणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.
७. सदर रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्यासाठी रोड स्क्रपींग करणे, खोदकाम करणे, हि कामे करीत असतांना जलवाहीनीची अथवा नागरीकांचे नळ संयोजनचे कोणतेही नुकसान झाल्यास, तुट फुट झाल्यास, त्याची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक राहील.
८. रस्त्याचे काम करतांना त्या रस्त्यावरील भुमिगत मलनिस्सारण योजनेची चेंबर असल्यास त्याची तुट फुट होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील, तसेच सदर चेंबर रस्त्याच्या पृष्टभागाशी समतल करणे आवश्यक राहील व त्यासाठी अंदाजपत्रकात देखिल तरतुद करणे आवश्यक राहील.
प्रस्तावातील कोणत्याही रस्त्याचे काम सुरु करण्यापुर्वी सात दिवस आधी सुचित करणे आवश्यक राहील, त्यामुळे त्या रस्त्यावरील पाईपलाईन दुरुस्ती नळ संयोजन अथवा इतर आवश्यक कामे मनपा मार्फत पुर्ण करुन घेणे शक्य होईल.

उपरोक्त अटी शर्तीस बंधनकारक राहुन ना-हरकत दाखला देण्यास व तद्नंतर सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.
विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**